# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०–२५६३०२३५
ई–मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


जा.क्र.झोपुप्रा/शुल्क आकारणी/प्रशा/८८७२/२०१९
दि. १ /११/२०१९

**कार्यालयीन परिपत्रक क्र :- २३**

<u>विषय</u> :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगी निर्गमित करणेपुर्वी आकारण्यात येणा-या विविध शुल्क भरणा रकमेचे टप्पे ठरविणेबाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे अंतर्गत पुनर्वसन योजनेच्या बांधकाम/रेखांकन नकाशांना मंजूरीपुर्वी विविध शुल्क (जसे छाननी फी, जमिन/बांधकाम विकास शुल्क, बाल्कनी/टेरेस/पॅसेज/जिना,प्रिमियम, राडारोडा चार्जेस, बांधकाम उपकर इ.) आकारणी केली जाते.

सध्या बांधकाम क्षेत्रातील मंदीचे वातावरण असल्याने उक्त नमूद शुल्क रकमेमध्ये विकसक ५०% रक्कम बांधकाम परवानगी देणेपुर्वी व उर्वरीत ५०% रक्कम (व्याजासह) पुढील बांधकाम टप्प्यावर भरणेबाबत मागणी करीत असतात.

सबब झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गतीमानता येणेसाठी उपरोक्त विविध शुल्क रक्कम खालील टप्यांप्रमाणे आकारणी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

१) एकूण भरणा रकमेच्या ५०% रक्कम बांधकाम परवानगी (नकाशा मंजूरी) निर्गमित करणेपुर्वी भरणा करून घेण्यात यावी.
२) एकूण भरणा रकमेच्या उर्वरीत ५०% रक्कम अधिक १८% द.सा.द.शे व्याज दराने येणारी रक्कम अशा एकूण रकमेचा पोस्ट डेटेड (तीन महिन्याच्या तारखेनंतरचा) चेक स्वीकारून तसेच सदरचा पोस्ट डेटेड चेक न वटल्यास (Bounced) विकसक फौजदारी कारवाईसह सर्व कायदेशीर कार्यवाहीस/ शिक्षेस पात्र राहील, अशा आशयाचे हमीपत्र विकसकाकडून घेवून, त्याबाबत बांधकाम परवाना पत्रात अट नमूद करून बांधकाम परवानगी (नकाशा मंजूरी) देणेत यावी.
३) पोस्ट डेटेड चेक लेखा विभागाने वरील दिनांकाच्या दिवशी प्राधिकरणाचे खात्यात जमा करावा.
४) चेक जमा न (Bounced) झाल्यास सदर बाब लेखा विभागाने मु.का.अ. यांचे त्वरीत निदर्शनास आणून देवून, पुढील यथोचित कायदेशीर कारवाई करणेत यावी.

सदरचे परिपत्रक तात्काळ अंमलात येईल.

१.११.२०१९

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

प्रत :- १) सचिव, झो.पु.प्रा, पुणे.
२) स.संन.र झो.पु.प्रा, पुणे.
३) नगररचनाकार झो.पु.प्रा, पुणे.
४) उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१,२,३ झो.पु.प्रा, पुणे.
५) उपसंचालक, लेखा विभाग, झो.पु.प्रा, पुणे.
६) उपअभियंता क्र.१,२,३ झो.पु.प्रा, पुणे.
७) विधी अधिकारी, झो.पु.प्रा, पुणे.
८) सहाय्यक निबंधक, झो.पु.प्रा, पुणे.
९) संगणक अधिकारी, झो.पु.प्रा, पुणे.